# भारतीय महाविद्यालय, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

# २०१७-१८

**प्रा.पंडित ल. काळे**
कार्यक्रम अधिकारी
**प्रा.गायत्री सु. चवाळे**
महिला कार्यक्रम अधिकारी

---

## - विशेष शिबीर अहवाल -

सत्र २०१७-१८ चे विशेष शिबिर दत्तक ग्राम निंभोरा ता.भातकुली येथे ११ जाने २०१८ ते १८ जाने २०१८ या कालावधीत ''स्वच्छ भारत समृध्द भारत'' या संकल्पनेतून संपन्न झाले. शिबिरामध्ये एकूण १०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या रा.से.यो.पथकाद्वारे ग्रामस्थांमध्ये जन जागृती करण्याचा प्रयत्न केला. विविध प्रबोधनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे ग्रामवासियांचे उद्‌बोधन करण्यात आले. यामध्ये ग्राम स्वच्छता, व्यसनमुक्ती, किर्तन, अंधश्रध्दा निर्मुलन, पर्यावरण जनजागृती शेतकरी आत्महत्या, दिंडी, प्रभात फेरी, रांगोळी स्पर्धा, गीत गायन स्पर्धा इत्यादी कार्यक्रम शिबिरामध्ये राबविण्यात आले.

विशेष म्हणजे ''बंधारा'' व ''शेततळे निर्मिती'' या जलसंधारण प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. हे प्रकल्प राबवितांना गावकऱ्यांचा सहभाग महत्वाचा होता. गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे या योजनेला पूर्णत्व आले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून गावातील मुलांना प्रेरणा मिळावी म्हणून ''गीत गयन स्पर्धा'' तसेच गावातील भजनी मंडळाचा कार्यक्रम किर्तन इत्यादी कार्यक्रमाद्वारे सांस्कृतिक वातावरण निर्मिती करण्यात आली. त्याचप्रमाणे कलेचा आविष्कार व्हावा यासाठी रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पाककला स्पर्धा या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला.

दि.११ जाने रोजी शिबिर स्थळी आगमन झाल्यावर प्रथम परिसर स्वच्छता व गावात येणाऱ्या मुख्य रस्त्याची स्वच्छता व सजावट करण्यात आली. शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदानाचे नियोजन व पाहणी करण्यात आली. तसेच गावातील पोलीस पाटील व गावकरी मंडळीशी चर्चा करण्यात आली. दि.१२ जाने, २०१८ रोजी सकाळी प्रभात फेरी काढून शिबिराच्या उद्‌घाटन समारंभची तयारी केली. सकाळी १०.०० वाजता शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्रा.डॉ.अलका गायकवाड यांनी संत गाडगे बाबा, स्वामी विवेकानंद व मॉ जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.आराधना वैद्य (भारतीय महाविद्यालय, अमरावती) तर प्रमुख उपस्थिती डॉ.मीना कांबळे, डॉ.मंगल भाटे, कार्यक्रम अधिकारी प्रा.पंडित काळे, महिला कार्यक्रम अधिकारी

प्रा.गायत्री चवाळे उपस्थित होत्या. तसेच निंभोरा येथी सरपंच श्री मेघश्याम घोंगडे उपसरपंच श्री अनिरुध्द धवने व मुख्याध्यापक ज्ञानेश्वरराव गिरी प्रामुख्याने उपस्थित होते.

या शिबिरामध्ये विविध सांस्कृतिक व बौध्दिक कार्यक्रम घेण्यात आले. तसेच रा.से.यो.च्या स्वयंसेवकाकडून व गावकऱ्यांच्या सहकार्याने विशेष जल संधारण प्रकल्प राबविण्यात आले. यामध्ये शेततळे व बंधरा निर्मिती करून जल संचय करण्यात आला. बौध्दिक सत्रामध्ये 'कुष्ठरोग जनजागृती' या विषयावर डॉ.अंकुश शिरसाठ यांचे व्याख्यान झाले. त्यांनी कुष्ठ रोग्यांची लक्षणे, माहिती व उपचार यांची माहिती दिली व प्रश्नावलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.तर 'वित्तीय साक्षरता' या विषयावर प्रा.नितिन तट्टे यांचे व्याख्यान झाले.

'प्लास्टिक निर्मुलन' या विषयावर डॉ.दीपलक्ष्मी कुळकर्णी यांनी प्लास्टिक पासून होणारे आजार या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. 'विद्यार्थ्यांनो निर्भय व्हा!' या विषयावर प्राजक्ता मंगेश राऊत यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा संदर्भात व इतर आव्हानांना कसे सामोरे जायचे या विषयी मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये रिझवान यांचा 'झंकार पंचरंगी' कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज प्रबोधन व मनोरंजन करण्यात आले. तसेच नेत्रदान व अवयव दान या विषयी त्यांनी रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांना आवाहन केले. तसेच सप्त खंजेरी वादक पंकज पाल महाराई, रूई ता.मानोरा जि.वाशिम यांचा किर्तनाचा कार्यक्रम झाला. त्यांनी मनोरंजनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले. ग्रामगीतेतील विचार व गाडगेबाबा यांचे विचार समाजासमोर मांडले. समाजातील अंधश्रध्दा व अनिष्ट प्रथा यावर कडाडून हल्ला केला व ग्राम गीतेतील सम्यक विचार सर्वांनी अंगीकारला असेही त्यांनी यावेळी सांगितले.

समारोपीय कार्यक्रमापूर्वी प्रमुख पाहुण्यांनी विशेष शिबिराच्या कार्य पुर्तीचा आढावा घेतला. शेततळे व बंधारा निर्मितीचे काम पूर्ण झाल्याचे पाहून समाधान व्यक्त केले. सर्व स्पर्धेचे बक्षिस वितरण करण्यात आले. या उपक्रमामध्ये गावकरी मंडळीचा उत्स्फुर्त सहभाग लाभला.

दि.१८ जाने., रोजी रा.से.यो. शिबिराचा समारोपीय कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.आराधना वैद्य होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.सतिश कुळकर्णी (सरचिटणीस भारतीय विद्यामंदिर, अमरावती) हे होते. प्रमुख उपस्थिती मा.अण्णाजी यादगिरे, प्रा.डी.एन.यादगिरे, कार्यक्रम अधिकारी, प्रा.पंडित काळे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.गायत्री चवाळे व ग्रामातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

**प्राचार्य**

**भारतीय महाविद्यालय, अमरावती.**